नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०४/२०२६ (शुक्रवार )**

## मा. श्री सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली नागपुर परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे संवाद संमेलन पार पडले.

## पोलीस अधिकारी /अंमलदाराच्या तक्रारींचे करण्यात आले निराकरण

आज दिनांक ०३/०४/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली नागपुर परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे संवाद संमेलन संपन्न झाले. सदर संवाद संमेलनासाठी नागपुर परिक्षेत्रातील नागपुर ग्रामीण, चंद्रपुर, भंडारा आणि वर्धा या जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. मा. पोलीस महासंचालक यांनी उपस्थित पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या अडीअडचणी, तक्रारी तसेच कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे जाणून घेतले. उपस्थितांनी मांडलेल्या समस्यांकडे पोलीस महासंचालक यांनी गांभीर्याने लक्ष देत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या व तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याचे निर्देश दिले. सदर पोलीस संमेलनात पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कर्तव्यनिष्ठ राहून उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन सुध्दा मा. पोलीस महसंचालक यांनी केले.

सदर संवाद संमेलनास मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परीक्षेत्र , मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण तसेच श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्यासह नागपुर ग्रामीण जिल्हयातील तसेच परीक्षेत्रातील अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.


Webex
Pin to taskbar
Close window


Webex
Pin to taskbar
Close window







## १.११४ किलो गांजा सह, अग्निशस्त्र आणि वाहन असा ६ लाख ४ हजार ६४० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :– दिनांक ०२/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशिर माहीती दिली की, हयुंडाई आय २० कार क्रं एम एच ४६ ए पी ७७२६ ने हिंगणा, नागपुर कडुन एमआयडीसी बोरी कडे अंमली पदार्थ गांजा विक्री करीता आणण्यात येत आहे. नमुद पथकाने सदर माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन नागपुर सालई दाभा फाटा नागपुर ते

एमआयडीसी बोरी रोडवर नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान पांढऱ्या रंगाची हयुंडाई आय २० कार क्रं एम एच ४६ ए पी ७७२६ ही कार मिळुन आली. पोलीस पथकाने चालक आरोपी यास नाव पत्ता विचारले असता आरोपी नामे **विजय भिक्कुजी महाकाळकर, वय ३३ वर्षे, रा वार्ड क्रं ६, राजीव नगर, वानाडोंगरी, हिंगणा रोड नागपुर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीस पथकाने नमुद वाहनाची कसुन झडती घेतली असता वाहनात वाहन चालकाचे बाजुचे सिटवर कापडी पिशवीमध्ये गांजा सदृश्य वनस्पती आढळुन आली. तसेच मागच्या सिट वर एक लोखंडी नळी व लाकडी बट असलेली भरमार बंदुक मिळुन आली. पोलीसांनी आरोपीला अधिक विचारपुस केली असता त्याचे कडे अग्निशस्त्राचा परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा १.११४ किलोग्रॅम किंमती २०,०००/—रुपये , २) लोखंडी नळी व लाकडी बट असलेली भरमार बंदुक अग्निशस्त्र किंमती ४०,०००/—रुपये, ३) ०१ मोबाईल किंमती २०,०००/— रुपये, ४) हयुंडाई आय २० कार क्रं एम एच ४६ ए पी ७७२६ किंमती ५,००,०००/— रूपये आणि , १९,६४०/— रूपये रोख रक्कम असा एकुण ६,०४,६४०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे कलम ८(क), २० (ब), (ii),(ब) २९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. अंमली पदार्थ गांजा आणि अग्निशस्त्र पुरवाठा करणारा आरोपीबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली असुन पोलीस त्यांचा शोध घेत आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस सदर प्रकरणाचा तपास करीत आहेत.**




**कारवाई पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## १४३ ग्रॅम गांजा, रोख रक्कमेसह २४ हजार २६० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, १ आरोपी अटक, नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक ०२/०४/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक नागपुर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. सदर पथकाने माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन बुटीबोरी पोलीसांसह संयुक्त कारवाई करत सर्तक पेट्रोलींग केली असता वारंगा शिवारातील एका दुकानातील एक ईसम हा शासकिय वाहन पाहुन हातात पिशवी घेवुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन जात असल्याचे दिसुन

आल्याने पथकास त्याच्यावर  संशय आल्याने त्याला थांबवुन नावपत्ता विचारले असता आरोपी क्रं १) **रोशन रंगलाल गुंदी, वय. २१ वर्षे रा. गोसावी नगर, ता. जि. नागपुर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपी अधिक विचारपुस करता तो उडवा उडवीचे उत्तरे देवु लागला . त्यामुळे त्याच्यावरील संशय बळावल्याने पोलीसांनी पंचासमक्ष त्याची आणि कडील पिशवीची झडती घेतली अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. गांजा पुरवाठा करणाऱ्या आरोपीबाबत विचारपुस केली असता आरोपी क्रं २) **श्याम रंगलाल गुंदी वय. २५ वर्षे, रा.गोसावी नगर ता.जि.नागपुर** या आरोपीने गांजा पुरवाठा केल्याची माहीती प्राप्त झाली.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा १४३ ग्रॅम, गांजा सेवनकामी लागणारे गोगो पेपर , लाईटर ,रोख रक्कम , मोबाईल असा एकुण २४,२६० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ८(क), २० (ब), (ii),(अ) २९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**



**कारवाई पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत आरोपीला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील गुन्हयातील सक्रिय आरोपी **विनायक श्रीराम नेवारे, वय ६४ वर्षे, रा. चारगाव (बडेगाव), ता. सावनेर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **विनायक श्रीराम नेवारे, वय ६४ वर्षे, रा. चारगाव (बडेगाव) ता सावनेर याचेवर अवैध दारू विक्रीचे अनेक गुन्हे तसेच अंमली पदार्थ सेवनाचे सुध्दा गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले. तसेच त्याचे गुन्हेगारी कृत्यावर प्रतिबंध बसण्यासाठी प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद गुन्हेगार **विनायक श्रीराम नेवारे, वय ६४ वर्षे, रा. चारगाव (बडेगाव) ता सावनेर याला १ महीन्यांकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार गुन्हेगार विनायक श्रीराम नेवारे**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, भिवापुर पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०२/०४/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सेलोटी शिवारात नाकाबंदी केली असता एक ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६ एल १८४७ आणि त्याला जोडलेली विनाक्रमांकाची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. **आरोपी क्रं १) वाहन चालक ज्ञानेश्वर गोपीचंद लेकरूवाडे, वय ५० वर्षे रा. थुटानबोरी ता भिवापुर जि नागपुर** , हा मिळुन आला. त्याला वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) वाहन मालक राहुल रामाजी ढेंगे वय ३० वर्षे, रा थुटानबोरी ता भिवापुर जि**

**नागपुर**,याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६ एल १८४७ आणि त्याला जोडलेली विनाक्रमांकाची ट्रॉली आणि १ ब्रास रेती असा एकुण किमती ३,५५,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे**.

## अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांना घेवुन जाणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद ४४ गोवंश जनावरांची सुटका,नरखेड पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०१/०४/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पांढुर्णा कडुन ४० ते ५० बैल कत्तलीकरीता गोवंश जनावरांना गळयाला घट्ट दोरीने बांधुन त्यांना लाठीने मारुन त्यांना निर्दयतेने कत्तलीकरीता परसोडी (राऊत) ते येरला शिवारातुन रोडने राजुरा बाजार, ता. वरूड, जि अमरावती येथे पायदळ घेवुन जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीसांनी तात्काळ येरला रोडवर सापळा रचला असता २३:०० वाजेच्या सुमारास दोन इसम जनावरे घेवुन येतांना दिसले. पोलीसांनी शिताफिने त्यांना पकडुन नाव पत्ता विचारले असता आरोपी नामे **१) जितेंद्र मदनसिंग परिहार, वय २४ वर्षे, आणि २) नामदेव उर्फ देवा श्यामरावजी बावणे पंढरी, वय ३६ वर्षे, दोन्ही रा. पंढरी, ता. सौसर, जि. पांढुर्णा, राज्य. मध्यप्रदेश** अशी माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांना जनावरांच्या पावत्यांबाबत विचारना केली असता त्यांच्याकडे काही जनावरांबाबत काहीही पावत्या/ कगदपत्रे नव्हती. नमुद जनावरांना गळयाला घट्ट दोरीने बांधुन त्यांना चारापाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीकरीता नेत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ४४ गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली. नमुद आरोपी विरूध्द भारतीय न्याय संहीता, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि**

**प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन नरखेड पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ७ मोबाईल, ५ दुचाकी वाहनासह ३ लाख २७ हजार २२० रूपयांचा मुद्देमाल जप्त, वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक ०२/०४/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, झुल्लर शिवार, चेहडी रोड, ता. मौदा येथे काही ईसम काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. वडोदा पोलीसांना सदर माहीती प्राप्त होताच त्यांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१).रविंन्द्र प्रल्हाद मोटघरे, वय ३९ वर्षे, रा.,झुल्लर, २) रमेश सुखदेव नागमोते, वय ४२ वर्षे, रा.झुल्लर, ३) संभा उर्फ युवराज पंजाबराव वानखेडे, वय ३६ वर्षे, रा. झुल्लर, ४). दिनेश कैलास राउत, वय ३६ वर्षे, रा. इंडाल्को कंपनी, मौदा ता. मौदा, ५). भिमराव नत्थुजी मेश्राम, वय ३८ वर्षे, रा.इंडाल्को कंपनी, मौदा, ता.मौदा, ६) सतिश ज्ञानेश्वर वानखेडे, वय ३५ वर्षे, रा. झुल्लर, ता.कामठी, आणि ७). नितेश रामकृष्ण गजभिये, वय ३६ वर्षे, रा.सुकडी ता.कामठी हे जागीच ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.**

**आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ७,२२०/—रुपये व एकुण ७ मोबाईल किंमती ७०,०००/— रुपये , ५ दुचाकी किंमती २,५०,०००/—रुपये असा एकुण ३,२७,२२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## पोस्टे पाचगाव हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक ०२/०४/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, मौजा कुही फाटा येथे आरोपी जवाहर राजेन्द्र राय हा कागदावर आकडे लिहुन सट्‌टीपट्‌टी चालवित आहे. अशी माहीती प्राप्त होताच पाचगाव पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन तात्काळ कारवाई केली असता आरोपी **जवाहर राजेन्द्र राय, वय ५७ वर्षे, रा. चांपा, ता. कुही, जि. नागपुर** हा कागदावर

आकडे लिहुन सट्टापट्टी चालवितांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन पंचासमक्ष सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागदी चिठ्ठया ,रोख रक्कम २३७०/— रूपये असा एकूण २३७२/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन पाचगाव येथे आरोपीविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**